पुण्य नगरी

# In Short

## डॉ. मगदूम फार्मसी कॉलेज येथे पूल कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन

**जयसिंगपूर :** फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या नवीन संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर आणि वेलनेस फॉरएवर प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने पूल कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. हा महत्त्वपूर्ण उपक्रम दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत कॉलेजमध्ये पार पडणार आहे. वेलनेस फॉरएवर प्रा. लि. ही एक भारतातील आघाडीची फार्मसी कंपनी असून जलद औषधे, आरोग्यसेवा आणि वैयक्तिक काळजी उत्पादने घरोघरी पोहोचवण्याची सुविधा देते. या रिक्रुटमेंट ड्राईव्हमध्ये डी. फार्मसी व बी. फार्मसी उत्तीर्ण विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २.४ ते ३.५ लाख पॅकिज वेलनेस फॉरएवर प्रा. लि. कंपनीतर्फे देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीत नोकरी मिळविण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे, तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे ठरलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन कॉलेजचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार एस. पाटील व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागप्रमुख प्रा. विनोद पाटील यांनी केले आहे.